जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 OCT 2021
लोकमत

# गांधी जयंतीनिमित्त शहरात स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेतर्फे शहरातील प्रेक्षणीय आणि वारसा स्थळांच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. मोहिमेत दोन टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला.

अंबाबाई मंदिर, गांधी मैदान, महाद्वार रोड, रंकाळा परिसर, संभाजीनगर ते देवकर पाणंद, शालिनी पॅलेस, खासबाग मैदान परिसर, रामनंदनगर, बालाजी पार्क, शाहू समाधिस्थळ, पापाची तिकटी परिसर, पंचगंगा नदीघाट परिसर, गंगावेश, उत्तरेश्वर परिसर, शिवाजी विद्यापीठ मेनरोड, प्रतिभानगर, कोटीतीर्थ तलाव परिसर, टाकाळा खण परिसर, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्टेशन, ताराबाई पार्क, न्यू पॅलेस, टेबलाईवाडी मंदीर, कावळा नाका परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता मोहिमेत एक जेसीबी, दोन डंपर, चार ट्रॅक्टर ट्रॉली, तीन आरसी गाड्या, चार औषध फवारणीचा वापर करण्यात आला.

उपायुक्त शिल्पा दरेकर, सहाय्यक आयुक्त विनायक औंधकर, संदीप घार्गे, मुख्य लेखापाल संजय सरनाईक, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उपशहर रचनाकार रमेश मस्कर, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, नारायण भोसले यांनी सहभाग घेतला.

लोकमत

# राष्ट्रासाठी निष्ठा अर्पण करा

## तुषार गांधी : सामाजिक विषमता हाच मोठा अडसर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्र उद्धारासाठी नागरिकांनी 'मी आणि माझे भले' ही वृत्ती सोडून वेळ, विवेक आणि निष्ठा अर्पण करण्याची गरज आहे. तसेच सामाजिक विषमता ही महात्मा गांधी यांच्या स्वप्नातला भारत साकारण्यामधला प्रमुख अडसर आहे, असे प्रतिपादन गांधी यांचे पणतू विचारवंत तुषार गांधी यांनी शनिवारी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्यावतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महात्मा गांधी' या विषयावरील विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

तुषार गांधी म्हणाले, सध्या श्रीमंतांकडे अमाप संपत्ती आहे की इतक्या प्रचंड ऐश्वर्याचे करायचे काय, हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे, तर दुसरीकडे गरिबाला दोनवेळची भूक भागविण्याची भ्रांत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनंतर समोर आलेली ही विषमता अत्यंत क्लेषकारक व चिंताजनक आहे.

0 3 OCT 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरकरांकडून लाभलेले प्रेम अविस्मरणीय


## परदेशी विद्यार्थ्यांच्या कृतज्ञ भावना : शिवाजी विद्यापीठात सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ परिवारातील विविध घटक आणि कोल्हापूरकरांकडून लाभलेले प्रेम, सहकार्य अविस्मरणीय स्वरूपाचे आहे, अशा भावना विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतून पदवी, पदव्युत्तर पीएच.डी. संशोधन पूर्ण केलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी मंगळवारी व्यक्त केल्या.

विद्यापीठाच्या अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांत केंद्रीय परराष्ट्र विभागाच्या इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स स्कॉलरशीप स्कीम अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये पदवीसाठी आणि सन २०१९-२० मध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी परदेशी विद्यार्थी प्रवेशित झाले होते. या विद्यार्थ्यांनी येथील शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना निरोपादाखल सत्काराचा कार्यक्रम विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाने घेतला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कोरोनाकाळात घरापासून हजारो किलोमीटर दूर असूनही विद्यापीठाने खूप जिव्हाळ्याने काळजी घेतली. या प्रेमाबद्दल विद्यापीठ, कोल्हापूरचे आपण कायम ऋणी आहोत, अशी भावना या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. त्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, डॉ. जी.एस. राशीनकर, एस.एस. महाजन, के.डी. सोनावणे, व्ही. वाय. धुपधाळे, आदी उपस्थित होते. ए. व्ही. घुले यांनी प्रास्ताविक केले.

### वर्घा मोखलेसी पहिला परदेशी पीएच.डी.धारक



सन २०१७-१८मध्ये मानसशास्त्र या विषयात पीएचडीसाठी प्रवेश घेणारा वर्घा बाहमन मोखलेसी हा इराणचा विद्यार्थी विद्यापीठातून पीएचडी पदवी प्राप्त करणारा पहिला परदेशी विद्यार्थी ठरला आहे. त्यांच्यासह एकूण २० विद्यार्थ्यांनी यावर्षी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. इराक, मॉरिशस, अफगाणिस्तान, मोझांबिक, गिनिआ बिस्सू या देशांतील विद्यार्थ्यांचा त्यामध्ये समावेश आहे. चार विद्यार्थिनीदेखील आहेत.

लोकमत

# फंगाई वॉक

आंबा : येथील आंबेश्वर देवराई मध्ये फंग इंडिया ग्रुपच्या वतीने फंगाई वॉकचे आयोजन करण्यात आले होते. यात शिवाजी विद्यापीठातील निसर्ग मित्रांनी सहभाग घेतला. अभ्यासक पांडुरंग बागम यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी फंगाई वॉकची सुरुवात झाली. देवराईतील विविध बुरशी प्रजातींची माहिती देण्यात आली. यामध्ये अजिंक्य बेर्डे.राहुल घट्टे, वर्धन सूर्यवंशी रुपेश मोरे सहभागी होते.

03 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांच्यासह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

विवेकानंद महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. एम. एम. कारंजकर व रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रा. समीक्षा फराकटे यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा वेध घेतला. अध्यक्षीय मनोगतात प्रा. भाऊसाहेब गोसावी म्हणाले, महात्मा गांधी हे जागतिक पातळीवर मानवतावादाचे शांतीदूत होते. त्यांचे सत्य, धर्म, सत्याग्रह, स्वच्छता, प्रामाणिकपणा, स्वावलंबन याविषयीचे विचार अनुकरणीय आहेत. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. बी. के. गोसावी, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. सुनीता भोसले, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. संतोष कुंडले आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात सह्याद्री व्याघ्र प्रकल्प रॅलीचे स्वागत



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी व्याघ्र प्रकल्प रॅलीचे आगमन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांची त्यांचे स्वागत केले. नॅशनल टायगर कॉन्झर्व्हेशन ॲथॉरिटीच्या ऑफ इंडिया संकल्पनेतून ५१ टायगर प्रोजेक्टची झोननुसार विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक विभागातून रॅली काढली जात आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पापासून रॅलीने कराडनंतर कोल्हापुरात आली. यानंतर दांडेली येथे ही रॅली जाणार आहे. वाघ आणि मुनष्य यांचा समन्वय साधून वन सुरक्षित करता याबाबत जागृती करणे हा रॅलीचा उद्देश असल्याचे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक समाधान चव्हाण यांनी सांगितले. मुनष्य आणि प्राण्यातील युद्ध असून त्यामुळे वाईट प्रसंग येत आहेत. त्यास भविष्यात सामोरे जावे लागू नये. यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे. रॅलीच्या माध्यमातून सामान्यांपर्यंत निसर्ग, प्राण्यांचे महत्त्व अधोरेखित करण्याची संधी आहे, असे मत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले.

03 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘तपोवन’वर तरुणाईची स्वच्छता मोहीम

## दै. ‘पुढारी’ प्रयोग सोशल फाऊंडेशन, शिवाजी विद्यापीठ ‘एनएसएस’चा संयुक्त उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तपोवनभूमी महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, संत गाडगे महाराज यांच्यासह विविध क्षेत्रांतील दिग्गजांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. आजच्या तरुण पिढीने हा गांधी विचारांचा वारसा पुढे जतन करून ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन विद्यापीठ सोसायटीचे चेअरमन ॲड. धनंजय पठाडे यांनी केले.



**कोल्हापूर : महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनप्रसंगी दै. ‘पुढारी’चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, श्रीराम पचिंद्रे, विद्यापीठ सोसायटीचे चेअरमन ॲड. धनंजय पठाडे, डॉ. अभय जायभाये, मुख्याध्यापिका अनघा कशाळकर आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

### विविध महाविद्यालयांचा उत्स्फूर्त सहभाग

स्वच्छता मोहिमेत विवेकानंद महाविद्यालय, महावीर कॉलेज, कमला कॉलेज, केएमसी कॉलेज, गोखले कॉलेज, राजाराम महाविद्यालय, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, कसबा बावडा, भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज, सायबर महिला विद्यालयासह नेहरू युवा केंद्र, महानगरपालिका आरोग्य विभाग वॉर्ड-ए (२)चे कर्मचारी यांच्यासह सुमारे १०० हून अधिक स्वयंसेवक सहभागी झाले होते.

पुढारी प्रयोग
प्रयोगातून प्रगतीकडे
सोशल फाऊंडेशन

दै. ‘पुढारी’ प्रयोग सोशल फाऊंडेशन, शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने तपोवन हायस्कूल येथील महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त चरखा आश्रम परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, यावेळी ते बोलत होते. ॲड. पठाडे यांनी तपोवनभूमीचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, तुकडोजी महाराज, बाबा मेहेर, माजी पंतप्रधान मोरारजी देसाई, लता मंगेशकर यांच्या कुटुंबांतील सदस्य, अनेक अभिनेते येथे येऊन गेले. काहीजण वसतिगृहात राहून शिक्षण घेत मोठ्या पदावर गेल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : तपोवन हायस्कूल परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी.**

दै. ‘पुढारी’चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील म्हणाले, महात्मा गांधी यांचा पावन स्पर्श लाभलेली भूमी आहे. या ठिकाणी पाऊल ठेवणे हे भाग्य आहे.

महात्मा गांधी यांना जाणून घेण्यासाठी त्यांची अहिंसा चळवळ, सत्याग्रह आदी गोष्टींचा तरुणाईने अभ्यास करावा; तेव्हाच त्यांच्या मनातील गैरसमज दूर होतील. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये म्हणाले, महात्मा गांधी यांनी तरुणांवर श्रमाचे संस्कार व्हावेत यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ‘एनएसएस’ सुरू झाले. महात्मा गांधी यांचा स्पर्श झालेल्या भूमीत ‘एनएसएस’ स्वयंसेवकांना श्रम करण्याची संधी मिळाल्याने राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

दै. ‘पुढारी’चे कार्यकारी संपादक (पुरवणी) श्रीराम पचिंद्रे म्हणाले, तपोवनभूमीचे राष्ट्रीय पातळीवर महत्त्व आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी वसतिगृहात राहून शिक्षण घेत मोठी शिखरे पादाक्रांत केली आहेत.

दै. ‘पुढारी’ प्रयोग सोशल फाऊंडेशनचे विक्रम रेपे यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. आदिनाथ कांबळे यांनी आभार मानले. यावेळी शिलादेवी डी. डी. शिंदे सरकार हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अनघा कशाळकर, रविदास पाडवी, प्रा. सचिन धुर्वे यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# म. गांधीजींच्या स्वप्नातला भारत साकारण्यात विषमतेचा अडसर

## तुषार गांधी यांची खंत; विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशातील वाढती विषमता आणि प्रत्येक बाबीच्या उत्सवीकरणाला आलेले उधाण चिंताजनक बाबी आहेत. महात्मा गांधी यांच्या स्वप्नांतला भारत साकारण्यामधील हे प्रमुख अडसर आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महात्मा गांधी' या विषयावरील विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तुषार गांधी म्हणाले, महात्मा गांधींची स्वप्नातल्या भारताची संकल्पना आदर्श रामराज्याची आहे. मात्र, सध्या श्रीमंतांकडे अमाप संपत्ती असून इतक्या ऐश्वर्याचे करायचे काय, हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. दुसरीकडे गरिबाला दोन वेळची भूक भागविण्याची भ्रांत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनंतर समोर आलेली ही विषमता क्लेषकारक, चिंताजनक आहे. महामारीच्या



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे गांधी जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना तुषार गांधी. (छाया : नाज ट्रेनर)**

कालखंडात विषमतेचे प्रत्यंतर प्रकर्षाने आले.

प्रजासत्ताकात नागरिकांची जबाबदारी सर्वाधिक महत्त्वाची असल्याचे सांगून गांधी म्हणाले, केवळ मतदान केले की झाले, असा बेजबाबदारपणा आला आहे. प्रत्यक्षात जगण्यामध्ये श्वासाचे जे महत्त्व आहे, तेच प्रजासत्ताकात नागरिकांचे आहे, हे आपण विसरून गेलो आहोत. राजधानीच्या सीमेवर शेतकरी आंदोलन करताहेत, त्या आंदोलनाप्रती उदासीनता चिंताजनक आहे. शेतकऱ्यांनी ठरवले, तर आपल्यावर बाका प्रसंग ओढवेल, याचा विचार होत नाही. स्वार्थ, चंगळवाद बाजूला ठेवून देशाच्या भल्याचा विचार करायला हवा. महात्मा गांधी यांना रामाची हिंसा नव्हे, तर त्याची मर्यादापुरुषोत्तमता अभिप्रेत होती. त्या मर्यादांचा आदर्श घ्यायला हवा. रामराज्य सामाजिक न्याय, समता, समानता व आदर्श समाज प्रस्थापनेचे प्रतीक आहे. आपली दांभिकता सोडून हे समजून घेत नाही, तोवर राष्ट्रसुधारणा अशक्य आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महात्मा गांधी यांनी स्वच्छता व आरोग्य रक्षण, ग्रामविकासातून राष्ट्रविकास अर्थात शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धन अशी विकासाची त्रिसूत्री दिली आहे. त्रिसूत्रीच्या आधाराने प्रत्येक नागरिकाने राष्ट्रविकासासाठी सज्ज होण्याची गरज आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

03 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंगळवाद बाजूला ठेवल्यास देशाचा विकास

## तुषार गांधी : शिवाजी विद्यापीठात गांधी अभ्यास केंद्रातर्फे विशेष व्याख्यान

कोल्हापूर, ता. २ : स्वार्थ, चंगळवाद बाजूला ठेवून देशाच्या भल्याचा थोडा जरी विचार केला तर महात्मा गांधी यांच्या स्वप्नातला भारत सत्यात उतरण्यास वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, लेखक व सामाजिक कार्यकर्ते तसेच महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी आज येथे केले. देशातील वाढती विषमता व प्रत्येक बाबीचे उत्सवीकरणाला आलेले उधाण चिंताजनक असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि महात्मा गांधी' विषयावरील विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे म. गांधी जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना तुषार गांधी.**

### श्री. गांधी म्हणतात

- शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रती उदासीनता चिंताजनक
- मध्यमवर्गाची वागणूक बांडगुळाप्रमाणे
- विकासाच्या संकल्पनेचाही फेरविचार व्हावा
- शेतकऱ्यांना मिळणारी कामे हलक्या दर्जाची
- विकास प्रक्रियेत बलिदान देणारा एक, लाभार्थी दुसराच
- बड्यांच्या जमिनींना यात धक्का का नाही
- सत्यापासून पलायन करण्याची वृत्ती ही राष्ट्राची दुर्बलता

श्री. गांधी म्हणाले, "महात्मा गांधींची स्वप्नातल्या भारताची संकल्पना आदर्श रामराज्याची आहे. यामध्ये गांधीजींना एक असे प्रजासत्ताक अभिप्रेत आहे, ज्यामध्ये दुर्बलातल्या दुर्बल व्यक्तीच्या आवाजाला महत्त्व असेल. सध्या श्रीमंतांकडे एवढी अमाप संपत्ती आहे की, इतक्या प्रचंड ऐश्वर्याचे करायचे काय, हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे, तर दुसरीकडे गरिबाला दोन वेळची भूक भागविण्याची भ्रांत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनंतर सामोरी आलेली ही विषमता चिंताजनक आहे." ते म्हणाले, 'महामारीच्या कालखंडात या विषमतेचे प्रत्यंतर प्रकर्षाने आले. जिथे लोकांना रोजगार आहेत, तिथे त्यांना आश्रय नाही;आणि जिथे आश्रय आहे, तिथे रोजगार नाही. त्यामुळे हजारो मैलांची पायपीट करून आपापल्या आश्रयस्थानी परतण्याचे केविलवाणे जिणे त्यांच्या वाट्याला आले. बापूंच्या स्वप्नातील फारकतच आपल्याला येथे दिसून येते. मतदान केले की झाले, असा बेजबाबदारपणा आपल्यात आला आहे." केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

0 3 OCT 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीजींच्या विचाराशिवाय राष्ट्रसुधारणा नाही

## ज्येष्ठ विचारवंत, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा गांधीजी यांना रामाची मर्यादापुरूषोत्तमता अभिप्रेत होती. त्या मर्यादांचा आदर्श आपण घ्यायला हवा. गांधीजींचे रामराज्य सामाजिक न्याय, समता, समानता आणि आदर्श समाज प्रस्थापनेचे प्रतीक आहे. आपली दांभिकता सोडून महात्मा गांधीजींचे विचार समजून घेतल्या शिवाय राष्ट्रसुधारणा होणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, लेखक व सामाजिक कार्यकर्ते तसेच महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि महात्मा गांधी' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या



**कोल्हापूर : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत तुषार गांधी.**

प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तुषार गांधी म्हणाले, महात्मा गांधीजींच्या स्वप्नातल्या भारताची संकल्पना आदर्श रामराज्याची आहे. गांधीजींना दुर्बल घटकाच्या आवाजाला महत्व देणारे प्रजासत्ताक अभिप्रेत आहे. यामध्ये गरीब-श्रीमंत, धर्म-जात, प्रांत-भाषा असा कोणताही भेद असेल. समताधिष्ठित समाजात प्रत्येकाला न्याय मिळेल. परंतू सध्या श्रीमंतांना आपल्या संपत्तीचे काय करायचे असा प्रश्न आहे. दुसरीकडे सर्वसामान्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षानंतरही देशातील विषमता चिंताजनक आहे. कोरोनात ही विषमता प्रकर्षाने जाणवली अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, देशाच्या विकासाच्या संकल्पनेचाही फेरविचार व्हावा. विकास करताना एखादा महामार्ग, उद्योग उभारण्यासाठी उद्योजकांना सवलतीत, शेतकऱ्यांच्या मोफत जमिनी दिल्या जातात. त्या बदल्यात शेतकऱ्यांच्या वारसाला हलक्या दर्जाची नोकरी मिळते. त्यामुळे विकास प्रक्रियेत बलिदान देणाऱ्याला नव्हे तर दुसऱ्यालाच लाभ मिळतो. नफेखोरी बंद झाली की उद्योग बंद होवून, जमिनीही गायब होतात. यात नुकसान होते फक्त शेतकऱ्यांचे, गावकऱ्यांचेच. ही राष्ट्रभर फोफावलेली विषमता गांधीजींना अभिप्रेत नव्हती. आदर्श राष्ट्रासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने आपला थोडा वेळ, विवेक आणि निष्ठा राष्ट्रासाठी अर्पण केली पाहिजे असेही ते म्हणाले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी परिचय करून दिला. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांच्यासह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### दिल्लीतील शेतकरी आंदोलन चिंताजनक : तुषार गांधी

राजधानीच्या सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत, त्या आंदोलनाप्रती आपली उदासीनता सुद्धा चिंताजनक आहे. शेतकरी आपला अन्नदाता आहे, हे आपण विसरतो आहोत. उद्या शेतकऱ्यानेही जर ते विसरायचे ठरवले तर आपल्यावर काय प्रसंग ओढवेल, याचा आपण विचार करायला हवा.